Vol II Issue IX

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume,II, Issue.9,Oct, 2012
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *आदिवासी लोकसंस्कृतीतील धार्मिक जीवन*

***आर.एल.बोबडे,***

मराठी विभाग,
दादासाहेब बिडकर महाविद्यालय,
पेठ, ता.पेठ, जि. नाशिक.

***प्रस्तावना :—***

आदिवासी समाज व निसर्ग यांच्यातील जवळचे नाते आहे. निसर्गावर त्यांचे जीवनमान अवलंबून आहे. निसर्गातील प्रत्येक वस्तूमध्ये कोणती तरी एक शक्ती असते. त्या शक्तीला मानवी जीवनामध्ये वेगळे महत्व आहे. आदिवासी निसर्गातील देवतांना मानतात त्या अनुशंगाने आदिवासीचा कृशी जीवनाशी संबंध आल्यामुळे धार्मिकतेच्या सहाय्याने त्यांची एक संस्कृती निर्माण झालेली असून, या विश्वातील प्रत्येक मानवाचा सामाजिकतेच्या दृश्टीने धार्मिकता आणि मानवी जीवन यांचा जवळचा संबंध आलेला आहे. एकूण धर्म व मानवी जीवन या मानवाच्या जीवनातील एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. यास अनुसरून आदिवासी संस्कृतीची जडण—घडण अगदी साधी, सोपी आहे. आपल्या चालीरिती हौसमौज, सण, उत्सव या सारख्या संमारंभाच्या सहाय्याने पूर्ण करतात.  आदिवासी समाजाच्या संस्कृतीमध्ये स्त्री प्रमाणेच पुरूषांचाही मोठा सहभाग असतो.  त्यामुळे स्त्री—पुरूषांच्या जीवन पध्दतीचा समाजावर परिणाम झाला. एकुण आदिवासी कुटूंब समाजपध्दतीच्या रूढ पध्दतीचे अनुसरण करतांना दिसते. समाज आणि कुटूंब व्यवस्थेचा समाजात धार्मिकतेचा पगडा, त्यातून उदयास आलेल्या चालीरिती, लोकांचे आचार विचार धर्म लोकसंस्कृती यांचे पालन त्या समाज व्यवस्थेला करावे लागले.  याचा प्रत्यय आदिवासी धार्मिक जीवनाच्यया अनुशंगाने पुढील प्रमाणे दिसून येतो.

***1.भगत :—***

आदिवासी संस्कृतीमध्ये भगत मंडळींना समाजामध्ये मोठा सन्मान आणि समाज मान्यता मिळालेली आहे.  त्या भगताला लोक देवासारखे मानतात. आजार बरा करण्यासाठी भगत अंगारे, धुपारे करतो, त्यामुळे आदिवासी लोकांचा दवाखान्यापेक्षा भगतावर अधिक विश्वास आहे. धार्मिक आणि पौराणिकतेच्या आधारे गाणी, गीत गाऊन धार्मिक व सामाजिक उद्‌बोधन करण्याच्या हेतूने भगतासारख्या संस्था समाजजीवनामध्ये आलेल्या आहेत.  देवाचे भगत म्हणून लोकजीवनामध्ये त्यांना विशेष महत्वाचे स्थान आहे. आदिवासी समाजामध्ये संकट निवारण्यासाठी या भगताची आदिवासी मदत घेतात.  समाज, समाजातील व्यक्ती आणि उपद्रव करणारी अज्ञानशक्ती यामध्ये भगत दुवा म्हणून काम करित असतो असे मानले जाते. वैद्य, ज्योतिशी, पुजारी, मार्गदर्शक म्हणून भगत काम करित असतात.  माणसे आजारी असल्यास भगताला बोलाविण्यात येते. तो भगत सुपामध्ये धान्य घेऊन आजारी व्यक्तिच्या अंगावरून त्या भगताच्या पध्दतीनुसार धान्य उतरवातांना तोंडातून कोणते तरी शब्द, मंत्र पुटपुटत असतो.  त्यावेळी उपस्थित सर्वलोक शांत होतात.  आदिवासी लोकांचा तो विश्वास संपादन करतो त्यामुळे भगताच्या प्रत्येक कृतीवर आदिवासींची श्रध्दा असते.  मंत्राच्या सहाय्याने भगत आदिवासी लोकांचे संकट, आजार, वाईट प्रसंग दूर करण्याचे उपाय सुचवितो.  या उपायामध्ये, उतारा करणे, अंगारा लावणे, गंडा करणे, कोंबडे, बकरे कापणे अशा प्रकारांचा समावेश असतो.  किरकोळ आजारांवर जंगलातील झाडांच्या मुळयांचा, झाडपाल्याचा औषध म्हणून तो प्रयोग करीत असतो.  कधी सर्पदंश, विंचूदंश, यावरसुध्दा मंत्रांचा उपचार करून झाडपाल्याचा औषध देतात. परंतू अलिकडच्या काळामध्ये सर्पदंश झाल्यास ग्रामिण रूग्णालयात त्या व्यक्तीस उपचाराकरिता दाखल करण्याचे प्रमाण वाढले आहे.  भगतानी संपादन केलेल्या तंत्र, मंत्र च्या विद्यानुसार साधा भगत, अस्सल भगत, जाळी—मुळी भगत असे भगताचे प्रकार पडतात.  एकुण दैवी संकटे, आपत्ती यापासून संरक्षण व्हावे म्हणून भगताच्या सल्ल्याने देवाची उपासना केली जाते.  घरातील आजारपण, गावात रोगराई, दुश्काळ, भांडण तंटा झाला तर भगताकडेच जावे लागते.  घरामध्ये कितीही दारिद्रय, आर्थिक परिस्थिती बिकट असेल तरी भगताने सांगितल्यानंतर नारळ, कोंबडा भगताला दयावाच लागतो. काहीवेळा भगतासाठी जेवण, दारूची व्यवस्था केली जाते. एकूण भगत म्हणजे आदिवासी समाज व्यवस्थेमध्ये असलेला मांत्रिक दैवी माणूस समजण्यात येतो. परंतू अलीकडच्या काळामध्ये शिक्षणामुळे, प्रसार माध्यमामूळे लोकांमध्ये जागृती निर्माण झाली. त्यामुळे परिस्थिती मध्ये बदल झालेला आहे.

***2.डोंगऱ्या देव / माऊल्या :—***

आदिवासी जमात प्रामुख्याने डोंगर दऱ्यामध्ये वास्तव्यास असणारी आहे.  काही ठिकाणी डोंगऱ्या देवास माऊली असेही म्हटले जाते. आदिवासी गावापासून डोंगराच्या कपारीमध्ये डोंगऱ्या देवाचे स्थान असते त्यालाच डोंगऱ्या देव मानले गेले आहे. डोंगर हा निसर्गातील घटक असून त्या डोंगराच्या सान्निध्यात जल स्त्रोताचा उगम होतो. त्यातूनच पुढे नदी, तलाव उदयास येतात. नदीमुळे मानवी जीवनाचा विकास होतो. एकुण या डोंगर राजाची पुजा करण्याची परंपरा प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. आदिवासी बांधव दिवाळी सण झाल्यानंतर साधारणतः डिसेंबर, हिवाळयामध्ये डोंगऱ्यादेवाचा उत्सव साजरा करतात. साधारणपणे डोंगऱ्यादेवासाठी अमावस्येचा दिवस शुभ समजला जातो.

**Please cite this Article as :*आर.एल.बोबडे,,आदिवासी लोकसंस्कृतीतील धार्मिक जीवन*:  Indian Streams Research Journal (Oct; 2012)**

आलिकडच्या काळात सात ते दहा दिवस उत्सवाचा कालावधी मानला गेला आहे. डोंगऱ्या देवाच्या पुजेमध्ये सहभागी होणाऱ्या माणसास काही ठिकाणी भाया, माऊली असे म्हणतात. हिवाळयाच्या दिवसामध्ये पहाटेच्या वेळी सामूहिक आरोली आली की, त्या ठिकाणी माऊलींचा उत्सव सुरू आहे याचा लोकांचा अंदाज येतो. याउत्सवामध्ये त्या परिसरातील गावातून लहान मुले, तरूण, जेश्ठ अशा अनेक माणसाचा त्यामध्ये समावेश असतो. 40 ते 50 लोकांचा या उत्सवामध्ये प्रत्यक्ष समावेश असतो. महिलांना प्रत्यक्षपणे यात सहभाग घेता येत नाही. परंतु पुजा, विधी दर्शन मात्र घेता येते. जी पुरूष मंडळी या उत्सवामध्ये सहभागी होतात त्या उत्सव संपेपर्यंत घरी जाण्यास परवानगी नसते. धार्मिक नियमाचेही पालन करावे लागते. सहभागी मंडळी देवाचे काम समजुन शुध्द मनाने ते काम करत असतात. उत्सवात सहभागी व्यक्तीला पहिल्या दिवसापासून उपवास करावा लागतो. सायंकाळी पाटलाच्या घरापासून या उत्सवाला प्रारंभ होतो. सहभागी भाया, माऊली फेरा धरून नाच नृत्य करीत डोंगऱ्या देवाची गाणी गातात. यावेळी पावरी आणि घुंगरू या निनादाने संपूर्ण परिसर मंगलमय होतो. यावेळी वाजवण्यात येणाऱ्या पावरी वाद्यास आगळे वेगळे महत्व असते. गावातील ग्राममंदिराजवळ रात्री जागरणासाठी संपूर्ण लोक जमा होतात. भगत मांत्रीक देवाची कथा सांगत असतो. गावात कोणाच्या घरी लहान मुल असेल तर त्याच्या डोक्यांवरून मांत्रिक मोर पिसारा फिरवून त्यास आर्शिवाद देतो. डोंगऱ्या देवाचा उत्सव थंडीच्या दिवसात असला तरी सहभागी मंडळी कमरेच्या वरती कोणतेही वस्त्र परिधान करीत नाही. या काळात त्यांना बाहेरचे जेवणही वर्ज्य असते. उपवासाचा दिवस शेंगदाणे, वरईची भाकरी खावून काढला जातो. रात्रीच्या जेवणामध्ये उडीद डाळ आणि भाकरी प्रमाणातच दिली जाते. शेवटच्या तीन चार दिवसामध्ये नातेवाईकांनाही कार्यक्रमाचे आमंत्रण देतात. नातेवाईक या प्रसंगी उपस्थित राहून पुजा विधीमध्ये सहभागी होतात. ज्या ठिकाणी उत्सव असतो त्या ठिकाणास खळी असे म्हणतात. त्या ठिकाणी वाघदेव, धोंबीदेव, भवानीदेव अशा अनेक ग्रामदेवतांचा समावेश असतो. शेवटच्या दिवशी बोकड बळीचा कार्यक्रम असतो. त्यावेळी सर्व नातेवाईकांना भोजनाकरीता आंमत्रित केले जाते. शेवटी डोंगऱ्या देवाचा पुजा विधी करून नवस पूर्ण केला जातो.

***3.भोव्हाडा :–***

बोहाडयाचा उत्सव हा आदिवासी लोकांमध्ये साजरा केला जातो. कोकणा, महादेव कोळी, भिल्ल, वार्ली इ. सारख्या जमातीमध्ये बोहाडयाला विशेष महत्वाचे स्थान आहे. चैत्र, वैशाख महिन्यामध्ये बोहाडयाच्या उत्सवाचे आयोजन केले जाते. ज्या पाडयावर यात्रा भरत नाही त्या पाडयावर ग्रामदेवतेचा मूहर्त पाहून बोहाडा उत्सव साजरा केला जातो. बोहाडया मध्ये सोंग, नृत्य, नाटय असले तरी श्रध्देबरोबर नवसाचेही अधिष्ठान लाभलेले असते. त्यामुळे बोहाडा ज्या ठिकाणी होणार असेल त्या परिसरातील सर्व आदिवासी बांधव विचार विनिमयाद्वारे बोहाडयामध्ये कोणती नवसाची सोंगे आणायची हे ठरवतात. मानाच्या सोंगामध्ये ग्रामदैवत, कुलदैवत, देवी, अशा सोंगाचे आयोजन केले जाते. ज्याच्या नावाने नवस केलेला असेल त्या देवतेच्या सोंगाचा समावेश नव्याने बोहाडात केला जातो. नव्या सोंगाची सुरूवात नवसात ठरल्याप्रमाणे त्या देवतेचा मुखवटा तयार करून त्याची विधीवत पुजा झाल्यानंतर त्या सोंगाचा समावेश श्रध्दाभावाने केला जातो. नवसाच्या सोंगामध्ये मानपान ठरलेले असतात. पाडयावरची मोकळी जागा, डोंगरा जवळची सपाट जागा, निवडून त्या ठिकाणी विधीवत बोहाडयाला आरंभ होतो. त्यामध्ये तीस–चाळीस आदिवासी पुरूष मंडळींचा, कलावंतचा समावेश असतो.बोहाडासाठी आजुबाजुच्या लोकांकडून वर्गणी गोळा केली जाते त्यातूनच देवीची पूजा, मिरवणूक, मुखवठे, सोंगाचा खर्च केला जातो. रात्रीच्या वेळी रॉकेल टेंभा करून बोहाडाचा कार्यक्रम सादर केला जातो. यावेळी ढोल, संबळ, तारफा, पावरी या वाद्याच्या नाद मधूर संगितामध्ये नृत्य सादर केले जाते. शेवटच्या दिवशी देवीची मिरवणूक पाडयातून जात असतांना आदिवासी महिला देवीची ओटी भरतात. देवीसाठी तेल देतात आणि मनातील इच्छा आकांशा देवीजवळ सांगतात. अनेक वेळा भुतबाधा, करणी–धरणी झालेल्या व्यक्तीसंबंधी देवीजवळ विचारणा होते. त्यावर पर्यायही सुचविला जातो.

***4.कणसरी मातेची पुजा :–***

आदिवासी समाज पाडयावर व शेतात राहत असल्यामुळे त्यांच्याकडे उपलब्ध असणाऱ्या शेतीवरच त्यांचा जीवन चारित्रार्थ चालत असतो. पावसाळयामध्ये शेतीला निसर्गाने अंघोळ घातल्यानंतर आदिवासी लोक जमिनीची मशागत सुरू करतात. नागंरणी करण्यापूर्वी हळदीकूंकुंवाने पुजा केली जाते. ज्यांना शक्य असेल ते नारळ फोडून पुजा करतात. शेतीची मशागत पूर्ण झाल्यानंतर भात लागवडीच्या वेळी धर्तीमातेची पुजा केली जाते. भाताचे पिक तयार झाल्यानंतर खळे तयार केले जाते. नागली मळणीच्या प्रक्रियेमध्ये सुपाचे महत्वाचे स्थान असते. नागलीच्या राशीवर दोन–तीन नारळ फोडून त्यावर दिवा लावून पुजा केली जाते. या पुजेकरिता कुकूंवाबरोबर बांगडया, उद, ऊस, करंडी,फणी, सारख्या साहित्याची आवश्यकता असते. पुजेचा आरंभा सायंकाळपासून होतो. काही आदिवासींना आर्थिक परिस्थितीमुळे हा उत्सव साजरा करता येत नाही. रात्रीच्या वेळी घांगळी वाद्याचा कार्यक्रम हा विशेश महत्वाचा असतो. घांगळी वाद्य हे तंतू वाद्य असल्यामुळे चार दोन गावामध्ये एखादयालाच वाजवता येते. यावेळी तो कणसरी (धान्य) मातेचे गुणगाण उपस्थित लोकांना ऐकविण्याचे काम केले जाते. स्त्री–पुरूष या दोघांनाही या कार्यक्रमाची विशेष आवड असते. एकुण सत्यनारायणच्या पुजेप्रमाणे कणसरी मातेची धान्यउत्पादनाची कथा सांगितली जाते. त्यापूर्वी पृथ्वी आणि आकाशातील परिस्थिती कणसरीमातेमुळे माणसाला आणि देवालाही सहन करावे लागणारे कष्ट यांचे वैशिष्ट पूर्ण वर्णन कथन केले जाते. रात्री सुरू झालेला कार्यक्रम सूर्योदयापर्यंत असतो. कार्यक्रम संपल्यानंतर नारळाचा प्रसाद वाटून समाप्ती केली जाते.

***5.वाघबारस :–***

आदिवासी समाजामध्ये अश्विन शुध्द द्वादशीला आदिवासी लोक वाघ बारशीचा सण साजरा करतात. पावसाळा ऋतू असल्यामुळे जंगल, डोंगर दरे, शेत, गावाच्या सभोतालचे गवत काढलेले असते. जंगलामध्ये वाघाचे वास्तव्य असल्यामुळे तो गावापर्यंत येतो त्यामुळे गाई–म्हशी, बकऱ्या, कोंबडया या वाघाच्या भक्षस्थानी पडतात. यावेळी वाघाची लहान–लहान पिल्ले त्याच्या आई बरोबर दिसतात. एकुणच संपूर्ण पावसाळयामध्ये वाघांचा ओघ सुरू असतो. वाघावर बसून देवी प्रवास करत असल्यामुळे आदिवासी मध्ये त्याची पुजा केली तर त्यापासून त्रास होणार नाही. याशिवाय तो आपल्याच परिसरात राहत असल्यामुळे त्याला देवासारखा मान देवून पुजाही केली जाते. जंगलाचा राजा असल्यामुळे राजाला शोभेल अशाच प्रकारचा खाद्य वाघाला दिले पाहिजे. त्याला प्रसन्न करण्यासाठी या दिवशी घरोघरचा कोंबडयाचा वाघदेवाजवळ बळी दिला जातो. गावाच्या परिसरात इतर देवा बरोबर वाघदेव ही असतो. वाघबारसंच्या वेळी पुजारी शेंदूर लावतात. प्रत्येक घरातून आलेल्या कोंबडा कापून त्याचे रक्त वाघदेवांवर शिंपडून त्याला अर्पण करतात. नंतर घराकडे गेल्यानंतर पंक्वान्न करून खाण्याचा रिवाज आहे. त्याप्रमाणे पावसाळयापूर्वी नवीन धान्याचे बियाणे कोंबडीच्या रक्ताने माखवून पेरले जाते. या प्रक्रियेस बी वाटावणे म्हणतात. तीच कोंबडी खातात. त्याकाळापासून ते वाघबारशी पर्यंत साधारणपणे आशाढ ते अश्विन या चार महिन्यांमध्ये कोंबडी खात नाहीत. हा कालखंड चार्तुमासाचा असल्यामुळे कोणी कांदयावर, तर कोणाचा पोथीपुराणावर चालतो. त्याप्रमाणे आदिवासी मात्र कोंबडी बंदी घालून हा चार्तुमासाचा कालखंड पाळत असतात. त्यानंतर नागपंचमी पासून मंत्रविद्या शिकण्यास सुरूवात होते. आपटयाच्या झाडाजवळ, बुध्यांपाशी गुरू पाच पुजके तांदळाचे, नारळ, कोंबडा अर्पण करतात व आजपर्यंत शिकविलेली सर्व विद्या मुखोद्गत केली जाते. त्यामध्ये चुकीची दुरूस्तीही केली जाते. कोंबडा मारून त्याचे रक्त गुरू शिश्याच्या कपाळास लावतो. त्या टिळा देणे म्हणतात. त्या ठिकाणी उपस्थित सर्व लोक या विधी कार्याचा

स्वयंपाक व मारलेल्या कोंबडयाचे जेवण करून समाप्ती होते. घरी आल्यानंतर वाघदेवाचे कोंबडे शिजवून तयार असते त्याचा प्रसाद म्हणून स्विकार केला जातो.

वाघ देवालात कोंबडे मारून घरी आल्यानंतर काही मुले दुसऱ्या पाडयावर जाऊन तांदूळ व दुध मागतात. त्यावेळी ही मुले झेंडूच्या फुलांची माळ, टोपीला झेंडूची फुले लावून सायंकाळच्यावेळी घरासमोर उभे राहून ''वाघ्याची भायरो दूध भात खायरो, तांब्याला आसरा घरी दोन वासरा, दिवाळी दसरा भाजीपाल विसरा'' असे म्हणत वासरू असेल त्या घरी जावून दूध मागतात, तांदूळ जमा करतात. एकत्र येवून दूध तांदूळ गावाबाहरे शिजवतात त्यात दुध घातले जाते हा दुध भाताचा नैवेदय म्हणून गावामध्ये प्रत्येक घरापर्यंत जाऊन वाटला जातो.

### *6.सर्वपित्री :–*

वैशाख संपल्यानंतर एक महिन्याने भाद्रपद वद्य अमावस्येला सर्वपित्री चा सण येतो. यावेळी पावसाचे प्रमाण कमी झालेले असे. दलदल कमी होऊन ऊन पावसाचा खेळ सुरू असतो. यावेळी जंगली भाजीपाला, शेतातील पावसाळी धान्य कारले, वांगी, दोडके, काकडया, इत्यादीची उपलब्धता मोठया प्रमाणाााात असते. नदी, नाले, तलाव, धरण यालाही भरपूर पाणी असल्यामुळे खेकडा, मासेही सहज उपलब्ध होतात. अशा वेळी सर्वपित्री हा सण भाद्रपद अमावस्येला साजरा केला जातो. यावेळी पितृश्राध्दाकरीता घरासमोर गोवरी पेटवून त्यामध्ये तांदूळ, हळद, तूप व जंगलातील भाजी त्यामध्ये टाकतात. त्यास आगेरी असे म्हटले जाते. आगेरीच्या वेळी सर्व भाज्या करतात. पित्तरांच्या पुजेकरीता दोडका, वांगे, मासे झाडाच पानातून गोवरीच्या आहारामध्ये भाजतात. पानावर तुप, तांदूळ, हळद यांना एकत्र गोठयाच्या जवळ मृत पुरूषांच्या नावाने आगेरी टाकली जाते. नंतर मृत महिलांच्या नावानं चुलीमध्ये घास टाकला जातो. काही वेळा पाण्याबरोबर दारूही सोडली जाते. दुसरे पान पितरांच्या नावे घरावर कावळयांना बोलावून आगेरी टाकली जाते. कावळयांनी घास उचलला नाही तर पित्र रागावले म्हणून शिवण्याची कावळयाला विनवणी करतात अखेर कावळा घास शिवतो. त्यामुळे माणसे जेवणास मोकळी होतात. त्यानंतर ढोल, पावरी, वाद्यांच्या आवाजात पुरूश, स्त्रिया नाचतात. सूर्यास्त होण्यापूर्वी घरातील केरकचरा, पत्रावळी सुपात भरून काकडी घालून गावाबाहेर जाऊन त्याची पुजा करून पाणी सोडतात.

कोकण आदिवासीचे जीवन हे निसर्गावर आधारीत असल्यामुळे उपजिविकेचे सर्व मार्ग निसर्गावर आधारित आहेत. त्याचे सामाजिक जीवन हे निसर्गाभिमुख बनलेले आहे. त्यामुळेच आदिवासी हा निसर्ग पुजक असतो. त्यांच्या धार्मिक कल्पना व दैव कल्पना या निसर्गाच्याच आधारानेच विकसीत झालेल्या आहेत. निसर्गाची कृपा असल्यामुळे आपल्याला अन्नधान्य मिळते. त्याकरीता निसर्ग देवतेस सदैव संतुष्ट ठेवावे त्यामुळे त्याच्या कृपेनेच आपले जीवन समृध्द होईल परंतु या आदिवासी माणसाकडून काही चुकले तर निसर्गाचा कोप होऊन मोठा अनर्थ निर्माण होऊ शकतो. निसर्गाचा कोप होऊ नये म्हणून निसर्गाची पुजा करून निसर्गाला आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करतात. आदिवासी धार्मिक जीवन पध्दतीही आगळी वेगळी आणि वैशिष्टय पूर्ण आहे. आदिवासीच्या धर्मव्यवस्था ही पूर्णपणे समानता, सहकार्यावर आधारीत आहे.
धर्मव्यवस्थेप्रमाणे कोणीही श्रेष्ठ नाही, कोणीही कनिष्ठ नाही. स्त्री–पुरूष यांच्यामध्ये समानता दिसून येते. त्यांच्या धार्मिक व्यवस्थेमध्ये डोंगरी देवांच्या उत्सवाला वेगळे महत्व आहे. त्याप्रमाणे भगत, वाघदेव, भोव्हाडा उत्सव, वाघबारस, आखाती, सर्वपित्री अमावस्या, होळी, कणसरीमाता, आदिवासींचा कल्पवृक्ष मोह या सारख्या अनेक घटकांना धार्मिक दृष्टया महत्व प्राप्त झालेले दिसून येते.

### *संदर्भ :–*

1.कोकण–कोकणी इतिहास आणि जीवन– डॉ.बी.ए.देशमुख, सुगावा प्रकाशन, पुणे.
2.आदिवासी जीवन कथा आणि व्यथा– सुरेश कोडितकर, सुगावा प्रकाशन, पुणे.
3.आरसा : आदिवासी जीवन शैलीचा –डॉ.भा.व्यं.गिरीधारी, युगांतर प्रकाशन नाशिक.
4.आदिवासी लोकगीतातील स्त्री जीवन–डॉ. अलका हिवाळे, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
5.आदिवासी सण–उत्सव, डॉ. सरोजिनी बाबर.
6.निशाद – डॉ. धैर्यशील शिरोळे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net